सायं.दैनिक
बीड किसान
www.beedkisan.in
• संपादक : शेख कामरान •
BEED KISAN

बीड ▪ वर्ष ६ ▪ अंक ३६ ▪ शुक्रवार, दि. १२ जून, २०२६ ▪ पोस्टल दिनांक १३ जून, २०२६ ▪ RNI : MAHMAR/2021/80738 ▪ Postal No. LSB/Beed/RNP-211/2024-2026 ▪ पाने ४ ▪ किंमत २ रु.
BEED ▪ Year-6 ▪ Issue-36 ▪ Friday 12 June, 2026 ▪ Postal Date 13 June, 2026 ▪ RNI : MAHMAR/2021/80738 ▪ Postal No. LSB/Beed/RNP-211/2024-2026 ▪ Pages 4 ▪ Price 2

## चार दिवसांत टीएमसीच्या चार राज्यसभा खासदारांचा राजीनामा.!

दिल्ली (किसान न्युज): टीएमसीचे राज्यसभा खासदार प्रकाश चिक बाराईक आणि कोएल मल्लिक यांनीही राज्यसभा सदस्यत्वाचा राजीनामा दिला. गेल्या चार दिवसांत, १३ पैकी चार राज्यसभा खासदारांनी ममता बॅनर्जी यांना सोडले आहे. सुष्मिता देव यांनी १० जून रोजी राजीनामा दिला. सुखेन्दु शेखर यांनी ८ जून रोजी राज्यसभा आणि पक्ष सोडला. यापूर्वी, बंडखोर टीएमसी खासदार काकोली घोष यांनी २० लोकसभा खासदारांनी एक वेगळा गट स्थापन केल्याचा दावा केला होता. इतकेच नाही, तर ८० पैकी ५८ टीएमसी आमदारांनीही एक वेगळा गट स्थापन केला आहे.

# राजा उदार झाला अन् हाती भोपळा दिला; लातूरच्या 'त्या' शेतकरी दांपत्याला भेट दिलेला सरकारी बैल निघाला अजारी

## खायचे वांदे तिथे शेतकऱ्याच्या बोकांडी उपचाराचा भार

बीड । किसान न्युज

**लातूर जिल्ह्यातील देवणी तालुक्यातील बोंबळी येथील शेतकरी काशिनाथ गायकवाड यांचा एक बैल वीज कोसळून मृत्युमुखी पडला. त्यानंतर एका बैलाच्या जागी पत्नीला औताला जुंपून शेतीची मशागत करत असल्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आणि राज्यभरातून हळहळ व्यक्त करण्यात आली. ज्या सरकारने वेळीच मदत न केल्यानी ही वेळ ओढावल्याचा संदेश राज्यात गेल्याने सरकारने तातडीने एक बैल देऊन फोटोसेशन करुन पाठ थोपटून घेतली पण या मदतीची दोन दिवसात पोलखोल झाली असून तो सरकारी बैल आजारी निघाला आहे. यामुळे आधीच खायचे वांदे त्यात या बैलाच्या उटचाराचा खर्चाचा भार या शेतकऱ्याच्या बोकांडी बसला आहे. याप्रकरणी आता राजा उदार झाला अन् हाती भोपळा दिला अशी प्रतिक्रिया व्यक्त केली जात आहे. शासनाने आधी मदत केली नाही आणि नंतर केली तर तो बैलही आजारी निघाला यामुळे शेतकऱ्याची सरकार थट्टा करीत असल्याचा आरोप करण्यात येत आहे.**



देवणी तालुक्यातील बोंबळी येथील एका शेतकरी काशिनाथ गायकवाड यांचा शेतात काही दिवसांपूर्वी एक बैल वीज पडून मृत्युमुखी पडला. खरीप हंगामातील पेरणीची वेळ सुरू असताना दुसरा बैल खरेदी करण्याइतकी आर्थिक परिस्थिती नसल्यानं अखेर कुटुंबानं स्वतःच शेतीची मशागत करण्याचा निर्णय घेतला. यावेळी काशीनाथ गायकवाड नांगर हाकत असताना त्यांच्या पत्नी हौसाबाई काशीनाथ गायकवाड यांनी दुसऱ्या बैलाच्या जागी औत ओढण्याचे काम केलं. ही हृदय पिळवटून टाकणारी ही घटना एका व्हायरल व्हिडिओमुळे समोर आली. यानंतर याबाबत संतप्त प्रतिक्रिया उमटल्या होत्या, शासन आणि प्रशासनाने वीज पडून बैल दगावला तरी वेळीच मदत न केल्याने या वृद्ध शेतकऱ्यावर ही वेळ आल्याचा संदेश राज्यभरात गेला. वृद्धापकाळातही शेती वाचवण्यासाठी या दाम्पत्याचा संघर्ष सुरू आहे. शेतकऱ्यांच्या आयुष्यातील कठोर वास्तव अधोरेखित करणारं हे दृश्य सध्या परिसरात चर्चेचा विषय ठरत आहे. हलाखीच्या परिस्थितीत असलेल्या गायकवाड कुटुंबाला मदत देण्याची मागणी ग्रामस्थांकडून केली जात होती, यानंतर शासन आणि प्रशासनाने लोकांमधील रोष पाहता तातडीने एक बैल उपलब्ध करुन या शेतकरी दांपत्याला दि. १० जून रोजी दिला. पण दोन दिवसात हा सरकारी बैल बसू लागल्याने स्थानिक पशू वैद्यकीय अधिकारी यांनी तपासणी केली असता तो आजारी असल्याचे निष्पन्न झाले. आधीच हे शेतकरी आर्थिक अडचणीत असून दररोजच्या खाण्यापिण्याची भ्रांत तिथे आता या आजारी बैलाच्या उपचाराचा खर्चाचा भार शेतकऱ्याच्या बोकांडी बसला आहे. यामुळे ही केवळ शेतकऱ्यांची थट्टा असल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली जात आहे. आधीच कर्जमाफी वरुन शेतकरी अटी व नियमांमुळे शासनाचा निषेध करीत असताना पुन्हा ही घटना समोर आली असल्याने संताप व्यक्त केला जात आहे.

### मुख्यमंत्र्यांना उशिरा जाग

**आज हा बैल अजारी असल्याचे वृत्त झळकताच आणि यावरुन आ. रोहित पवार, वडेट्टीवार, सपकाळ यांनी टीकेची झोड उठवल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना जाग आली. याबाबत सारवासारव करीत मुख्यमंत्र्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना सुदृढ बैल देण्याचे आदेश दिले असल्याची माहिती समोर आली आहे. पण आता ते कधी भेटेल याकडे लक्ष लागले आहे.**

# रोटाव्हेटर मध्ये अडकून गंभीर जखमी झालेल्या तरुणाचा मृत्यू

केज । किसान न्युज

**शेती मशागतीचे काम करत असताना ट्रॅक्टरच्या रोटाव्हेटरमध्ये अडकून गंभीर जखमी झालेल्या ३२ वर्षीय तरुणाचे लातूर येथे उपचारादरम्यान दुर्दैवी निधन झाले. मंगेश बाबुराव टोपे असे या मृत तरुणाचे नाव असून, तो केज तालुक्यातील साळेगाव येथील रहिवासी होता. तब्बल दहा दिवस मृत्यूशी झुंज दिल्यानंतर त्याची प्राणज्योत मालवली.**



२ जून रोजी मंगेश टोपे हा आपल्या शेतात खरीप हंगामापूर्वीची मशागत करत होता. यादरम्यान ट्रॅक्टरवर चढत असताना अचानक त्याचा तोल गेला आणि तो थेट चालू रोटाव्हेटरमध्ये अडकला. या भीषण अपघातात त्याच्या पोटाला गंभीर दुखापत झाली होती, तसेच पाय फॅक्चर होऊन कानालाही मोठी इजा झाली होती. अपघात झाल्यानंतर मंगेशला तातडीने केज येथील उपजिल्हा रुग्णालयात प्राथमिक उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. मात्र, प्रकृती चिंताजनक असल्याने पुढील उपचारासाठी त्याला लातूर येथील सह्याद्री हॉस्पिटलमध्ये हलवण्यात आले. तिथे गेल्या दहा दिवसांपासून त्याच्यावर उपचार सुरू होते. मात्र, गुरुवारी ( दि.११) मध्यरात्री १:३० च्या सुमारास उपचारादरम्यान त्याची प्राणज्योत मालवली. मंगेश अत्यंत गरीब कुटुंबातील असून तो मनमिळावू स्वभावाचा होता. त्याच्या या अचानक आणि अपघाती जाण्याने साळेगाव व परिसर हळहळत आहे. त्याच्या पश्चात पत्नी, दोन मुली, आई-वडील असा परिवार आहे. घराचा कमावता आधार गेल्याने टोपे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

# गांजा साठ्यावर एलसीबीचे पीआय बंटेवाड यांच्या टीमचा छापा

बीड । किसान न्युज

परळी ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दीतील धर्मपुरी येथे राहत्या घरात गांजाची साठवण व विक्री होत असल्याची गुप्त माहिती मिळाल्यानंतर बीड स्थानिक गुन्हे शाखेने धडक कारवाई करत तब्बल २०१ किलो ३४० ग्रॅम गांजा जप्त केला. या कारवाईत ९ लाख ७७ हजार ३२० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून मुख्य आरोपी बाबुलाल उर्फ बबलू भतार (रा. धर्मपुरी) याला पोलिसांनी अटक केली आहे. पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार धर्मपुरी येथील एका राहत्या घरात गांजाची साठवण करून त्याची विक्री केली जात असल्याची माहिती मिळाली होती.





त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने छापा टाकला असता घरातून मोठ्या प्रमाणात गांजा आढळून आला. पोलिसांनी २०१ किलो ३४० ग्रॅम वजनाचा गांजा ताब्यात घेतला. या प्रकरणी पोलिसांनी ९,७७,३२० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून संबंधितांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला » पान २ वर

# ब्रम्हगांवमधील हनुमानाच्या मूर्ती विटंबनाप्रकरणी आरोपी जेरबंद

बीड । किसान न्युज

चकलांबा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील ब्रम्हगांवमध्ये हनुमानाच्या मूर्तीला गुरुवारी रात्री (दि.२८) मे रोजी मटणाचा तुकडा चिकटविल्याने खळबळ उडाली होती.घटनेचे गांभीर्य बघता शुक्रवार (दि.२९) मे रोजी अप्पर पोलीस अधिक्षक,पोलीस उपाधीक्षक,स्थानिक गुन्हे शाखा आणि चकलांबा ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट देऊन गावकऱ्यांना शांतात पाळण्याचे आवाहन केले होते.अखेर या प्रकरणातील आरोपीला चकलांबा पोलिसांच्या मदतीने स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सापळा रचून गुरुवारी रात्री ब्रम्हगांवमधूनच अटक केली आहे.

चकलांबा पोलीस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या ब्रम्हगांवमध्ये हनुमानाची जुनी मूर्ती आहे.गावातील जागृत देवस्थान म्हणून भाविकांची याठिकाणी श्रद्धा आहे.गुरुवारी रात्रीच्या सुमारास अज्ञात व्यक्तीने हनुमानाच्या मूर्तीची विटंबना केली.हा प्रकार शुक्रवारी सकाळी समोर आल्यानंतर एकच खळबळ उडाली.गावकर्यांनी » पान २ वर

# जावेद भैय्या कुरेशी यांना शेर-ए-हिंद मौलाना बरकतुल्लाह पुरस्कार जाहीर

## बीडच्या बुलंद आवाजाचा राज्यस्तरीय बहुमान; एकता युवा मंचच्या अहोरात्र जनसेवेवर मोहर!

बीड । किसान न्युज

समाजातील सर्व घटकांच्या सुख-दुःखात सहभागी होत निःस्वार्थ भावनेने समाजसेवा करणारे बीडचे ख्यातनाम व लोकप्रिय समाजसेवक तथा 'एकता युवा मंच'चे संस्थापक जावेद भैय्या कुरेशी यांना यंदाचा अत्यंत प्रतिष्ठित आणि मानाचा शेर-ए-हिंद मौलाना बरकतुल्लाह स्मृती राष्ट्रसेवा व समाजभूषण पुरस्कार २०२६ जाहीर झाला आहे. 'साप्ताहिक युवा लोकमित्र' वृत्तपत्राच्या ५ व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून राज्यभरातील विविध क्षेत्रांतील दिग्गजांना गौरविण्यात येत असून, समाजकारण क्षेत्रातील त्यांच्या अभूतपूर्व, तळागाळातील आणि सर्वसमावेशक कामगिरीबद्दल जावेद भैय्या कुरेशी यांची या सर्वोच्च पुरस्कारासाठी सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात देशाबाहेर जाऊन क्रांतीची मशाल पेटवणारे गदर पार्टीचे संस्थापक आणि भारताच्या पहिल्या हंगामी सरकारचे पंतप्रधान » पान २ वर



## पाहिजेत

हॉटेल हिना लॉज
नाईट डे साठी
रुम बॉय पाहिजे
जालना रोड बीड
:: संपर्क ::
मो.7888118212
मो.7743878408

# रक्तबंबाळ अवस्थेत किराणा दुकानात मृतदेह आढळला

## हत्येच्या घटनेने धारुर तालुक्यात खळबळ; शवविच्छेदनासाठी मृतदेह अंबाजोगाईला हलवला

धारुर । किसान न्युज

तालुक्यातील पहाडी दहिफळ येथील एका किराणा दुकानात रक्तबंबाळ अवस्थेत मृतदेह आढळून आला असल्याने एकच खळबळ उडाली असून, हा प्रथमदर्शनी हा प्रकार हत्येचा दिसत असून याबाबत तर्कवितर्क लावले जात आहेत. घटनास्थळी धारुर पोलिसांनी भेट देऊन मध्यरात्री दोन वाजण्याच्या सुमारास मृतदेह शवविच्छेदनासाठी अंबाजोगाई येथे स्वाराती रुग्णालयात दाखल करण्यात आला. हा प्रकार नेमका काय? हे तपासातून व शवविच्छेदनाच्या अहवालातून स्पष्ट होईल. शरद आश्रुबा धनवे (वय ४५ वर्ष) रा. सोन्नाखोटा ता. वडवणी असे मयताचे नाव आहे. या व्यक्तीचा अज्ञात कारणावरून निर्घृण हत्या झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. पहाडी दहिफळ येथील एका किराणा दुकानात त्यांचा मृतदेह आढळून आल्याने संपूर्ण परिसरात प्रचंड खळबळ उडाली असून » पान २ वर

# अनिलदादा यांच्या निवासस्थानी महायुतीचे उमेदवार बसवराज पाटील यांची सदिच्छा भेट

बीड । किसान न्युज

धाराशिव-बीड-लातूर स्थानिक स्वराज्य संस्था विधान परिषद निवडणुकीतील महायुतीचे अधिकृत उमेदवार बसवराज पाटील यांनी काल दि. ११ जून २०२६ रोजी दु. ३.०० वाजता शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. यावेळी आमदार सुरेश धस, आ. अभिमन्यू पवार भाजप जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख उपस्थित होते. महायुतीचे उमेदवार बसवराज पाटील यांच्यासह उपस्थित सर्व मान्यवरांचे



अनिलदादा जगताप यांच्या परिवाराच्या वतीने विजय जगताप यांनी स्वागत सत्कार केला तर बीड जिल्हा शिवसेनेच्या वतीने जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, जिल्हाप्रमुख स्वप्नील गलधर तसेच सभापती संजय उडान, नगरसेविका शितलताई चक्रे, नगरसेवक सुरज चुंगडे यांनी स्वागत सत्कार केला. या भेटीदरम्यान आगामी » पान २ वर

स्थानिक सोने चांदीचे भाव..

पंकज ज्वेलर्स
पिंगळे गल्ली, कारंजा रोड, बीड
9850643058

| | |
|---|---|
| सोने २४ कॅरेट | 146,500 |
| २२ कॅरेट | 140,000 |
| चांदी प्रतिकिलो | 246,000 |

IMRAN KHAN +91 8237222266 / 8087111122
(BEED)

Hasnain
HAJJ UMRAH SERVICES
BOOKING OPEN

| DELUXE PACK | ECONOMY PACK | BUS SERVICE PACK |
|---|---|---|
| 15 Days 95,000/- | 15 Days 85,000/- | 15 Days 75,000/- |
| 20 Days 1,10,000/- | 20 Days 95,000/- | 20 Days 85,000/- |

INCLUDE
1. 3 times Indian Food Buffer
2. Laundry Service Free
3. Direct Flight
4. Umrah Visa With Insurance
5. 5 Litr Zam Zam Free
6. Umrah Bag Kit Free
7. Local Ziyarat Of Religious Places In Makkah & Madina Sharif
8. Hotel Loby free Internet

Adv. Rafiq Complex, Madina Jewellers beside, Karanja Road, Beed.

# अपघातग्रस्त दुचाकीस्वाराला महामार्ग पोलिसांची मदत

बीड । किसान न्युज

दुचाकी स्लीप झाल्याने घडलेल्या अपघातात दुचाकीस्वार गंभीर जखमी झाल्याची घटना गुरुवारी (दि.११) दुपारी २ च्या सुमारास मांजरसुंब्बा घाटात घडली आहे. घटनेची माहिती मिळताच महामार्ग पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन अपघातग्रस्ताला मदत करुन तातडीने रुग्णवाहिकेच्या मदतीने उपचारासाठी रुग्णालयात पाठवले आहे.बालाजी संजय कांबळे वय (वय २० वर्ष) रा. बावी तालुका भूम असे जखमी दुचाकी स्वाराचे नाव आहे. तो आपल्या दुचाकीवरून सोलापूर-धुळे महामार्गाने प्रवास करीत असताना दरम्यान तो या महामार्गावरील मांजरसुंब्बा घाटात पोहोचला असता अचानक दुचाकी स्लीप होऊन तो रोडवर पडून गंभीर जखमी झाला होता. या अपघाताची माहिती मिळताच महामार्ग पोलीस चौकी मांजरसुंब्बा येथील पोलीस कर्मचारी दयानंद कांबळे, सुरज मुंडे, सोमनाथ गंगावणे यांनी घटनास्थळी धाव घेऊन अपघातग्रस्ताला मदत केली. १०८ रुग्णवाहिकेने तातडीने मदत करीत उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले. महामार्ग पोलिसांच्या या तत्परतेचे कौतुक करण्यात येत आहे.



